**आरबीआय / २००६-०७ / १६**
**आरपीसीडी. क्र.पीएलएफएस. बीसी. १/०५.०४.०२ / २००७-०८**

जुलै २, २००७

(सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांचे) (आरआरबी सोडून)
अध्यक्ष / व्यवस्थापकीय संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रिय महोदय,

**महापरिपत्रक – नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रात बँकांद्वारे मदतकार्यांसाठी मार्गदर्शक तत्वे**

कृपया आमचे महापरिपत्रक, आरपीसीडी. क्र. पीएलएफएस. बीसी. ६/०५.०४.०२ / २००५-०६ चा संदर्भ घ्यावा. यात आम्ही नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रात घ्यावयाच्या मदतकार्यांसाठी बँकांना मार्गदर्शक तत्वे दिली होती. या विषयावरील महापरिपत्रक, २००७-०८ सध्या अस्तित्वात असलेली मार्गदर्शक तत्वे / निदेश समाविष्ट करुन तयार करण्यात आले असून त्याला पुरवणी जोडण्यात आली आहे. या महापरिपत्रकात समाविष्ट असलेल्या परिपत्रकांची यादी परिशिष्टा मध्ये देण्यात आली आहे.

कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासु

**सही**
**(जी. श्रीनिवासन)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

## नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रात बँकांद्वारे मदतकार्यांसाठी मार्गदर्शक तत्वे

आपल्या देशात, नियतकालिक परंतु वरचेवर येणारे दुष्काळ, पूर, वादळे, समुद्राला आलेले प्रचंड उधाण आणि इतर नैसर्गिक आपत्तींमुळे मोठ्या प्रमाणावर जिवितहानी, तसेच देशातल्या कोठल्या ना कोठल्या भागातील मानवाच्या अर्थव्यवस्थेची हानी होत असते. अशा नैसर्गिक आपत्तींमुळे होत असलेल्या प्रचंड नुकसानीसाठी सर्व प्रतिनिधी संस्थांनी मोठ्या प्रमाणावर मदत कार्य करण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. अशा आपत्ती-ग्रस्त लोकांचे आर्थिक पुनर्वसन करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणे निरनिराळ्या योजना तयार करत असतात. अशा आर्थिक पुनर्वसनासाठी वाणिज्य तसेच सहकारी बँकांनीही विकसनशील भूमिका करावयाची आहे.

२) अशा नैसर्गिक आपत्तींच्या बाबतीत स्थळ, काळ, तीव्रता आधीच वर्तवता येत नाहीत. त्यामुळे अशा आपत्तींच्या वेळी बँकांकडून मदत / सहाय्य विना विलंब देता यावे यासाठीच्या कृति योजना त्यांनी आधीच तयार करुन ठेवल्या पाहिजेत. याचाच सरळ अर्थ असा जिल्हा / राज्य प्राधिकरणांकडून नैसर्गिक आपत्तींबाबतची घोषणा केली जातेच,

वाणिज्य बँका आणि त्यांच्या प्रादेशिक व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये, अशा नैसर्गिक आपत्तींचे वेळी कोणत्या कृतियोजना तातडीने अंमलात आणावयाच्या या संबंधीचे स्थायी निदेश आधीच दिले गेले असले पाहिजेत. तसेच हे ही आवश्यक आहे की, हे निदेश राज्य सरकारच्या प्राधिकरणांकडे आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांनाही उपलब्ध केले गेले पाहिजेत कारण तसे केल्याने, ग्रस्त क्षेत्रात बँकांच्या शाखांकडून कोणत्या कृतियोजना राबविल्या जातील हे संबंधितांना स्पष्टपणे कळेल.

३) वाणिज्य बँकांकडून दिली जाणारी निश्चित कर्जरुप मदत ही प्रत्यक्ष परिस्थितीवर, बँकांच्या कार्यरीत क्षमतेवर आणि कर्जदारांच्या प्रत्यक्ष गरजेवर अवलंबून असेल. जिल्हा प्राधिकरणाराच्या सल्ल्यानुसार अशी कर्जरुप मदत निश्चित करता येईल.

४) तथापि, बँकांना एकसमान आणि एकत्रितपणे कृति करता यावी, आणि विशेषतर विपत्तीग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना, लघु उद्योगांना, कारागिरांना, लहान व्यापारी संस्थांना तातडीने मदत देता यावी म्हणून पुढील मार्गदर्शक तत्वांची शिफारस करण्यात येत आहे.

**१)संस्थात्मक व्यवस्था :-**

**ए) जिल्हास्तरीय सल्लागार समितीची सभा**

**५)** वित्तीय संस्थांनी तातडीची कृती करुन त्यात समन्वय यावा यासाठी आपत्तीग्रस्त जिल्ह्यांमधील जिल्हा सल्लागार समितीच्या निमंत्रकांनी अशा नैसर्गिक आपत्ती आल्यावर लगेच सभा निमंत्रित करावी. आपत्तींमुळे राज्याचा बराच मोठा भाग ग्रस्त झाला असल्यास, राज्यस्तरीय बँकांची समिती, राज्य / जिल्हा प्राधिकरणांच्या सहयोगाने, योग्य तो समन्वय असलेली कृतियोजना तयार करण्यासाठी ताबाडतोब एक सभा निमंत्रित करील. नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रस्त झालेल्या व्यक्तीला कितपत सहाय्य द्यावयाचे हे ठरविण्यासाठी, त्या व्यक्तीला सरकारी आणि / किंवा इतर संस्थांपासून मिळालेले अर्थसहाय्य ही विचारात घेईल.

**बी) एसएलबीसी ची विशेष सभा**

**६)** नैसर्गिक आपत्ति आल्याबरोबर लगेच ग्रस्त क्षेत्रांच्या परिस्थितीचे अवलोकन करण्यास, आणि सुयोग्य अशा मदत कार्यांची आखणी व अंमलबजावणी करण्यास, बँकांनी एसएलबीसीची विशेष सभा घ्यावी.

**७)** बँकांद्वारे केल्या जाणाऱ्या आपत्ति-व्यवस्थापनांच्या उपाय / व्यवस्थेबाबत, मदतीसाठी असलेल्या फोन-क्रमांकांसह त्यांनी योग्य ती प्रसिध्दी द्यावी. परिस्थिती सर्वसाधारण / मूळपदावर येईपर्यंत, खास स्थापन केलेल्या कृति गटांच्या किंवा उपसमितींच्या साप्ताहिक / द्विसाप्ताहिक सभांमधून सुरु केलेल्या व प्रत्यक्षात आणलेल्या मदतकार्यांचा आढावा घेण्यात यावा.

**सी) कार्याभिमुख दृष्टिकोन**

**८)** नैसर्गिक आपत्ति घडल्यानंतर विलंब टाळण्यासाठी, बँकांनी त्यांच्या संचालक मंडळांच्या सहमतीने याबाबत सुयोग्य धोरणाचा एक आराखडा बनवून त्याची एक प्रत आमच्या दप्तरासाठी (रेकॉर्ड) आम्हाला पाठवावी. एखाद्या राज्यात किंवा जिल्ह्यात असलेल्या परिस्थितीशी मेळ घालण्या-इतपत या मदत-उपायांमध्ये लवचिकता ठेवली जावी व त्या धोरणामधील कलमे (पॅरामीटर्स), एसएलबीसी / डीसीसी यांच्या सल्ल्यानुसार ठेवली जावी असा सल्ला देण्यात येत आहे.

**डी) मुखत्यारीचे अधिकार -**

**९)** बँकांच्या प्रादेशिक / क्षेत्रीय व्यवस्थापकांना आणि वाणिज्य बँकांच्या प्रादेशिक / क्षेत्रीय व्यवस्थापकांना काही मुखत्यारीचे (स्वतः निर्णय घेण्याचे) अधिकार दिले जावेत, तसे केल्याने त्यांना, जिल्हा / राज्य पातळीवरील बँकर्सच्या समितीने संमत केलेल्या कृति योजना अंमलात आणण्यासाठी, त्यांच्या केंद्रीय कार्यालयांची अनुमती घेण्याची गरज भासणार नाही. उदाहरणार्थ, असे मुखत्यारीचे अधिकार, अर्थसहाय्याचे प्रमाण, कर्जांसाठी मुदतवाढ, आणि कर्जदाराच्या एकूण पतक्षमतेचा विचार करुन (म्हणजे, अर्थसहाय्य केलेल्या मालमत्तेची नैसर्गिक आपत्तीमुळे हानि झाल्यास किंवा नष्ट झाल्यास व तसेच अशा मालमतेचा डागडुगी करण्यास नवीन कर्ज देण्याबाबत) नवीन कर्ज देणे यासाठी आवश्यक असतील.

**ई) लाभार्थींची ओळख**

**१०)** बँकांच्या शाखांनी, त्यांच्या कार्य क्षेत्रातील ग्रस्त खेड्यांची यादी सरकारी प्राधिकरणाकडून मागवून घ्यावी. ओळख पटलेल्या व्यक्तींमधून बँकेच्या सध्याच्या ग्राहकांच्या झालेल्या हानीचे मूल्यांकन करणे सोपे जाईल. तथापि, नवीन कर्जदारांच्या बाबतीत मात्र गुप्तपणे चौकशी केली जावी आणि तसेच त्यांच्या गरजा खरोखरच तेवढ्या आहेत काय हे पडताळून पाहण्यासाठी शक्य तेथे शासकीय प्राधिकरणांची मदतही घ्यावी. पिकांबाबत असलेल्या कर्जांच्या परिवर्तनासाठी अशी सुविधा देण्याची क्षेत्रे समजण्यासाठी, खाली दिलेल्या परिच्छेद (जी) मध्ये ‘पीक कर्ज’ शीर्षका खाली कार्यरीत सांगण्यात आली आहे.

**एफ) व्याप्ति**

**११)** प्रत्येक शाखा त्यांच्या केवळ अस्तित्वात असलेल्या कर्जदारांनाच नव्हे तर शाखेच्या कार्यक्षेत्रातील पात्र असलेल्या इतर व्यक्तींनाही कर्जसहाय्य करेल - मात्र त्यांना इतर कोणत्याही वित्त संस्थेकडून मदत मिळालेली नसावी.

**१२)** सहकारी सोसायट्यांच्या कर्जदार सभासदांसाठी द्यावयाची कर्जे, प्राथमिक शेतकी सहकारी सोसायट्या (पी.ए.सी.एस / एलएएमपीएस / एफएसएस) यांच्याकडून देण्यात येतील. तथापि, सभासदांना त्या सोसायट्यांच्या कर्जदार नसलेल्या सभासदांना त्या सोसायट्यांनी तातडीने ‘ना हरकत प्रमाणपत्रे’ दिल्यास, वाणिज्य बँकांच्या शाखा, अशा सभासदांना अर्थ सहाय्य करु शकतात.

**जी) अग्रक्रम**

**१३)** उभी पिके / फळबागा / बगीचे यांच्या संरक्षणासाठी व पुनरुज्जीवनासाठी, वित्तसहाय्य तसेच इतरही मदत तातडीने दिली जाणे आवश्यक आहे. आणि त्याच बरोबर पशुधनांचे गोठे / तबेले, धान्य व वैरण साठविण्याच्या जागा, सांडपाण्याची गटारे, पाण्याचे उदंचन करणारी व्यवस्था इत्यादींचे संरक्षण व डागडुजी केली जाणे, व या शिवाय, पंपसेट्स, मोटर्स, इंजिने व इतर आवश्यक साधने इत्यादींचाही त्यात समावेश केला गेला पहिजे. मोसमानुसार येणाऱ्या आवश्यकता लक्षात घेऊन पुढील पिकासाठी अर्थ सहाय्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे.

## २) शेतकीसाठी कर्जे

**१४)** शेतकीसाठी बँकेकडून दिले जाणारे अर्थसहाय्य, हे पिके घेण्यासाठी म्हणून कमी मुदतीच्या कर्जाद्वारे मिळणे आवश्यक आहे. आणि, दुभती / दुष्काळी गुरे विकत घेण्यास व अस्तित्वात असलेल्या नलिका-विहिरी, पंप-सेट्स यांची डागडुगी जमीन लागवडी खाली आणण्यास, गाळ-रेती दूर करण्यास, उभ्या पिकांचे / फळबागांचे पुनरुज्जीवन करण्यास, आणि पशुधनाच्या तबेल्यांचे, धान्य, वैरणीच्या वखारींच्या डागडुजी करण्यास मात्र मुदतीची कर्जे दिली जाणे आवश्यक आहे.

बँकांनी, ग्रस्त असलेल्या कर्जदारांना कर्ज देतांना, इतर बाबींबरोबर पिकांची झालेल्या हानीचे प्रमाण / आवश्यक असलेल्या वित्त सहाय्याचे प्रमाण तसेच कर्जदाराची परतफेड करण्याची क्षमता लक्षात घेऊन, कर्जदारांना नवीन कर्जे देऊ करावीत.

### ए) पिकांसाठी कर्ज

ए) नुकसान समजून घेणे

**१५)** दुष्काळ, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी, पिकांच्या नुकसानीची आणेवारी शासकीय प्राधिकरणाकडून घोषित केली जात असते. तथापि, अशी घोषणा केली गेली नसल्यास, बँकांनी परिवर्तन सुविधा देण्यास हयगय करु नये.
५०% च्या खाली पिके असल्याचे जिल्हाधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र व ते डीसीसीच्या दृष्टीने अनुमोदित असल्यास (यासाठी कदाचित एक विशेष सभा घ्यावी लागेल) मदतकार्य तातडीने देण्यास हरकत नसावी. जिल्हाधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र हे पीक-निहाय सर्व पिकांचा व धान्यांचा समावेश असलेले असावे. तथापि नकदी पिकांच्या बाबतीत दिले जाणारे प्रमाणपत्र हे

जिल्हाधिकाऱ्याच्या मतानुसार दिले जाईल. किंवा, दुष्काळ, पूर या सारख्या नैसर्गिक आपत्ती आल्यास जिल्हाधिकारी, लीड बँक ऑफिसरला, डीसीसीची सभा घेण्यास सांगून, नैसर्गिक आपत्तींमुळे त्या क्षेत्रात झालेल्या पिकांच्या हानीचा अहवाल डीसीसी कडे सादर करण्यास सांगू शकेल. नैसर्गिक आपत्तींमुळेच पिकांची खूप मोठी हानि झाली आहे असे डीसीसीचे समाधान झाल्यास, आणेवारी जाहिर केल्या शिवायही स्थायी मार्गदर्शक तत्वांनुसार परिवर्तन / पुनरुज्जीवन करण्यासाठी, आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना शेतीविषयक कर्ज-सुविधा दिल्या जातील.

**बी) नवीन कर्जे देणे व अस्तित्वात असलेल्या कर्जांची पुर्नरचना**

**१६)** नैसर्गिक आपत्तिंचे वेळी कर्ज मागणाऱ्यांना पुढील प्रमाणे वित्तसहाय्यांची गरज असेल -

१. उपभोग कर्जे
२. नेहमीचा व्यवहार चालू ठेवण्यासाठी नवीन कर्जे
३. अस्तित्वात असलेल्या कर्जांची पुर्नरचना

**१) उपभोग कर्जे**

**१७)** अस्तित्वात असलेल्या सूचनांनुसार, अस्तित्वात असलेल्या कर्जदारांना उपभोगण्यासाठी रु.२५०/- पर्यंतचे कर्ज देण्यात येऊ शकते. आणि राज्य सरकारांनी जोखीम निधी उभारला आहे अशा राज्यात ही सीमा रु.१०००/- पर्यंतही वाढविली जाऊ शकते. सध्याच्या सीमा, कोणत्याही तारणाशिवाय रु.१०,०००/- पर्यंत वाढविता येऊ शकतात. आणि अशी कर्जे जोखीम-निधी उभारलेला नसल्यासही देता येऊ शकतात. याशिवाय, बँकेला वाटल्यास ही सीमा रु.१०,०००/- च्या वरही वाढविता येऊ शकते.

**२) नवीन कर्जे**

**१८)** उत्पादनाची क्रिया परत सुरु करण्यासाठी, अस्तित्वात असलेल्या कर्जदारांनाच नव्हे, तर इतर पात्र अशा कर्जदारांनाही वेळेवर वित्तसहाय्य करता येईल. अस्तित्वात असलेल्या खात्याची स्थिती / अवस्था कशीही असली तरी कर्जदारांना दिलेली नवी कर्जे ही चालू (करंट) येणे म्हणून समजली जातील.

**३) अस्तित्वात असलेल्या कर्जांची पुर्नरचना**

**१९)** नैसर्गिक आपत्तींनी ग्रस्त झालेल्या लोकांची परतफेड करण्याची क्षमता, आर्थिक हानीमुळे कमी होत असल्याने, नैसर्गिक आपत्तीग्रस्त क्षेत्रातील कर्जांच्या परतफेडीसाठी सवलत देणे आवश्यक ठरते आणि म्हणून अस्तित्वात असलेल्या कर्जांची पुर्नरचना

करावी लागेल. नैसर्गिक आपत्ति आल्याच्या वर्षामध्ये अल्पमुदतीच्या कर्जाचे मुद्दल व परतफेडीचे येणे व्याज यांच्या एकुण रकमेचे मुदत कर्जात रुपांतर करता येईल. तसेच नैसर्गिक आपत्ती आल्याच्या वर्षात, मुदत कर्जाच्या मुद्दलाचा हप्ता व त्या वर्षातील व्याजाच्या रकमेचेही मुदत-कर्जात रुपांतर करता येईल.

**२०)** अशा पुनर्रचित कर्जाच्या परतफेडीचा काल हा त्या आपत्तीच्या कठोरपणावर / गांभिर्यावर, आणि तिच्या पुनरागमनाच्या शक्यतेवर, व आर्थिक मालमत्तेच्या हानीवर व दुःखावर अवलंबून असेल, सर्वसाधारणपणे असा पुनर्रचित काल हा ३ ते ५ वर्षांचा असू शकतो. तथापि, जेथे आपत्तीमुळे झालेले नुकसान अपरिमित आहे अशा वेळी, बँका त्यांच्या मतानुसार हा काळ ७ वर्षांपर्यंत व अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत, कृतिदल / एसएलबीसी यांच्या सल्ल्याने तो १० वर्षांपर्यंत वाढवू शकतात.

**२१)** पुनर्रचनेच्या सर्व प्रकरणात कर्ज-मुदत वाढविण्याचा काल किमान १ वर्ष असावा. याशिवाय, अशा पुनर्रचित कर्जांच्या बाबतीत बँकांनी अतिरिक्त तारणासाठी आग्रह धरु नये. पुनर्रचित कर्जांच्या बाबतीत मालमत्तेचे वर्गीकरण हे अशा एक वर्षाच्या पुनर्रचित कालासाठी , त्यावेळी अस्तित्वात असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसारच केले जाईल. अशा कर्जांसाठी मालमत्तेच्या वर्गिकरणाचा दर्जा पुढीलप्रमाणे असेल.

अ) अल्पमुदतीच्या कर्जाचा पुनर्रचित भाग आणि नवीन कर्जात रुपांतरित केलेली मुदत कर्जे ही सध्याचे / चालू येणे म्हणून समजली जावीत- त्यांचे वर्गीकरण एन पी ९ असे केले जाऊ नये. अशा नवीन मुदत कर्जांचे मालमत्ता वर्गीकरण हे त्यानंतर नवीन अटी व शर्तीनुसार ठरविले जाईल व त्या कर्जाच्या मुद्दलाचे आणि किंवा व्याजाचे हप्ते , कमी मुदतीच्या पिकांच्या दोन हंगामापर्यंत किंवा दिर्घ मुदतीच्या पिकांच्या एका हंगामापर्यंत मुदतबाह्य (ओव्हरड्यु) झाल्यासच ते एन पी ए असल्याचे समजले जाईल.

ब) उरलेल्या येणे असलेल्या व पुनर्रचित न केलेल्या रकमेचे मालमत्ता वर्गीकरण मूळच्याच अटी व शर्तीनुसार करणे सुरु असेल. त्यामुळे, कर्जदाराकडून येणे असलेल्या रकमेचे मालमत्ता वर्गीकरण, कर्ज देणाऱ्या बँकेकडून निरनिराळ्या मालमत्ता-वर्गीकरणाखाली केले जाईल- म्हणजे - प्रमाणभूत (स्टँडर्ड), अ-प्रमाणभूत, शंकास्पद, तोटा इ.

क) अतिरिक्त वित्त असल्यास ते प्रमाणभूत मालमत्ता समजले जाईल व भविष्यातील मालमत्ता वर्गीकरण, त्याच्या मंजुरीच्या अटी व शर्तीनुसार ठरविले जाईल.

**२२)** नैसर्गिक आपत्तींनी ग्रस्त झालेल्या स्वयंसेवी गट / संघटनांच्या बाबतीत कर्ज देणे व इतर मानके याबाबत बँका त्यांच्या इच्छेनुसार शिथिलता ठेवू शकतात. त्याचप्रमाणे, फुटकळ व ग्राहक कर्ज विभागात प्रत्येक प्रकरणानुसार, कर्जदारांना सोयिस्कर असलेल्या प्रकाराने कर्जांची पुनर्रचना करु शकतात.

**२३)** त्या नैसर्गिक आपत्तीच्या तारखेला असलेल्या पुनर्रचित खात्यांचे मालमत्ता वर्गीकरण हे नैसर्गिक आपत्तीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण झाल्यासच पुढे सुरु राहील. महापरिपत्रक डीबीओडी. क्र. बीपी. बीसी १५/२१-०४-४८/ २००६-०७ दि. जुलै ०१, २००६ च्या परिच्छेद ४-२-१४ ते ४-२-१६ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूत्रांनुसारच पुनर्रचित खाती नियंत्रित केली जातील. अ-प्रमाणभूत खात्यांना लागु असलेली मार्गदर्शक सूत्रे, त्यात योग्य ते बदल / फेरफार केल्यानंतर शंकास्पद खात्यांना लागु होतील.

**<u>क) रुपांतर सुविधांसाठी इतर मार्गदर्शक सूत्रे</u>**

१) परिवर्तित कर्जांसाठी व मुदतवाढ दिलेल्या कर्जांसाठी असलेल्या हप्त्यांचा भरणा करण्यासाठी शक्यतो, सामान्य (कॉमन) तारखा दिल्या जाणे प्रशस्त ठरेल.

२) नैसर्गिक आपत्तीचे वेळी परतफेड न झालेली (ओव्हरड्यू) कर्जे सोडल्यास, कमी मुदतीची सर्व कर्जे परिवर्तन सुविधेसाठी पात्र असतील.

३) कमी मुदतीच्या कर्जांचे परिवर्तन अनिर्णित ठेवून बँका, ग्रस्त शेतकऱ्यांना, पिकांसाठी नवीन कर्जे देऊ शकतात.

४) ग्रस्त शेतकऱ्यांना पिकांसाठी नवीन कर्जे मंजुर करतांना, अशा वेळी, नेहमीप्रमाणे देय तारीखेची वाट न पाहता, बँका कमी मुदतीच्या उत्पादन कर्जांचे परिवर्तन करु शकतात.

५) तसेच मुदत-कर्जांच्या मुद्दलाचे / व्याजाचे हप्ते हे देखील तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियत केले जाऊ शकतात आणि वरील ‘अ’ मध्ये दिल्यानुसार असलेल्या परिस्थितीत हा कालावधी वाढविता येतो.

६) परिवर्तित केलेल्या कर्जांसाठीचे व्याज दर हे कमी-मुदतीसाठी असलेल्या कर्जांच्या व्याजदरांएवढेच असावेत

७) जेव्हां शेतकऱ्यांना, कर्जांचे परिवर्तन/पुनर्रचना या स्वरुपात सुविधा दिली जाते, तेव्हां, अशी परिवर्तित / पुनर्रचित थकबाकी ही सध्याची (करंट) थकबाकी धरली जावी व अशा परिवर्तित / पुनर्रचित कर्जांच्या बाबतीत चक्रवाढ दराने व्याज बँकांनी आकारु नये.

**<u>ड) त्वरित सहाय्य</u>**

**२४)** चांगला परिणाम साधण्यासाठी शेतकऱ्यांना द्यावयाच्या मदतीचे त्वरित वाटप केले गेले पाहिजे. या साठी, लीड बँक, आणि संबंधित जिल्हा प्राधिकरण यांनी अशी एखादी पद्धत / प्रणाली विकसित करावी, की ज्यामुळे, कर्जदारांची ओळख, सरकारी / सहकारी / बँकेकडे द्यावयाच्या थकबाकीचे तसेच अर्जदाराना जमीनीची मालकी इत्यादींचे प्रमाणपत्र देणे या गोष्टी एकाच वेळी करता येतील.

**२५)** ब्लॉक डेव्हलपमेंट व रेव्हेन्यु ऑफिसर्स, सहकारी निरीक्षक, पंचायत प्रधान इत्यादि अधिकारी स्वतः हजर राहून, त्याच ठिकाणी अर्जांवर निर्णय घेऊ शकतील असे कर्ज मेळे भरविण्याची शक्यता पडताळून पाहण्यात यावी. तेथे जिल्हा प्राधिकरणाच्या सल्ल्यानु सार अर्जांवर त्वरित निर्णय देता येईल. अशा कर्ज-मेळा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी, राज्य शासन, जिल्हाधिकाऱ्यांकडून कार्यकारी आदेश काढून पुढील अधिकाऱ्यांना किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना विशिष्ट कार्ये व जबाबदाऱ्या नेमून देईल :-

अ) ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर
ब) सहकारी निरीक्षक
क) महसुल खात्याचा अधिकारी / ग्राम महसुल सहाय्यक
ड) त्या क्षेत्रातील कार्यरत बँकेचा अधिकारी
ई) पीएसीएस / एलएएमपीएस / एफएसएस
फ) ग्राम पंचायत प्रधान (सरपंच)

विलंब टाळण्यासाठी, कर्ज मेळ्यांमध्ये, राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी द्यावयाच्या प्रमाणपत्रांच्या नमुन्यांचे फॉर्म्स, संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून पुरेशा संख्येने छापून घेता येतील.

**२६)** पुढील पिकांच्या हंगामासाठी केलेल्या कर्जाच्या अर्जांचा विचार करताना, अर्जदाराची राज्य सरकारला द्यावयाची थकबाकी दुर्लक्षित केली जावी, मात्र नैसर्गिक आपत्ती कोसळण्याच्या दिवशी, सरकारला देय असलेल्या थकबाकीच्या सर्व रकमा पुरेशा मोठ्या कालावधीसाठी पुढे ढकलण्यात आल्याचे घोषणा पत्र (मोरोटोरियम) राज्य सरकारकडून मिळाले असले पाहिजे.

**ई) वित्तसहाय्याचे प्रमाण**

**२७)** एखाद्या जिल्ह्यात निरनिराळ्या पिकांसाठी वित्तसहाय्याचे प्रमाण समान असेल. असे प्रमाण ठरविण्यासाठी त्या वेळेची परिस्थिती आणि कर्ज देणाऱ्या निरनिराळ्या संस्थांनी स्वीकारलेली मानके विचारात घेतली जातील. संबंधित जिल्हा दंडाधिकारी आणि त्या जिल्ह्यात कार्यरत असलेल्या बँक-शाखांचे व्यवस्थापक यांना अशा प्रमाणांचे पालन / स्वीकार करण्यास सांगण्यात येईल.

**ब) विकासासाठी कर्जे- गुंतवणुकीचा खर्च**

**२८)** अस्तित्वात असलेल्या मुदत-कर्जाचे हप्ते, कर्जदारांची परतफेड करण्याची क्षमता आणि नैसर्गिक आपत्तीचे स्वरुप विचारात घेऊन पुनर्रचित / लांबणीवर टाकावे लागतील. म्हणजे –

१) दुष्काळ, पूर, आवर्तीवादळे इत्यादींमुळे केवळ त्या वर्षीच्याच पिकाचे नुकसान झाले असून उत्पादक मालमत्तेचे काहीच नुकसान झालेले नाही.

२) पूर किंवा आवर्ती वादळे – ज्यामुळे उत्पादक मालमत्तेचे अंशतः किंवा पूर्णतः नुकसान झाले असून कर्जदारांना नवीन कर्जाची गरज आहे.

**२९)** वरील वर्गवारी (१) मधील नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत, त्या आपत्तीच्या वर्षातील भरावयाचा हप्ता बँका पुढे ढकलू शकतात व कर्जाची मुदत एक वर्षाने वाढवू शकतात. मात्र यासाठी पुढील अपवाद आहेत :

(अ) विकास कामांसाठी किंवा गुंतवणुकीसाठी कर्ज घेतले असूनही ती कामे / गुंतवणुक न करणारे किंवा त्या कर्जातून घेतलेली साधने व यंत्रे विकून टाकलेली असणारे शेतकरी.

(ब) आयकर भरणारे

(क) दुष्काळात ज्यांचेकडे जलसिंचनाचा कायम / सतत स्त्रोत आहे असे लोक मात्र असे पाणी कालव्यांमधून मिळत नव्हते किंवा सततच्या इतर स्त्रोतांमधूनही ते दिले जात नव्हते असे लोक सोडून

(ड)ट्रॅक्टरचे मालक, मात्र ज्यांच्या उत्पन्नाची हानी झाली आहे व त्यामुळे ज्यांची परतफेड क्षमता कमी झाली आहे असे लोक सोडून. अशा या व्यवस्थेखाली आधीच्या वर्षांमधील जाणीवपूर्वक न भरल्या गेलेल्या हप्त्यांची पुनर्रचना केली जाणार नाही. कर्जदारांनी भरावयाचे व्याजही कदाचित बँकांना पुढे ढकलावे लागेल. अशी मुदतवाढ ठरवितांना कर्जदारांनी द्यावयाच्या व्याजाचे दायित्वही हिशेबात धरावे लागेल.

**३०)** वरील (२) या वर्गात, म्हणजे, जेथे कर्जदाराची मालमत्ता संपूर्णपणे नष्ट झाली असेल, तेथे कर्जदाराची परतफेड करण्याची सर्वसमावेशक क्षमता, जुन्या मुदत कर्जांची तसेच, लघुमुदतीच्या कर्जांची परतफेड करण्यासाठी दिलेल्या मुदतवाढी मुळे परिवर्तित कर्जाची (मध्यम मुदतीचे कर्ज) व नवीन पिकासाठी दिलेले कर्ज, या सर्वांची परतफेड करण्याचे कर्जदाराने दिलेले वचन, यांच्या आधारावर, कर्जाची मुदत वाढवून त्याची पुनर्रचना केली जाईल. अशा प्रकरणांमध्ये, एकूण कर्जाच्या (व्याजसह) परतफेडीचा कालावधी, हा सरकारी संस्थांकडून मिळालेले अर्थ सहाय्य (सबसिडी), विमा योजनांमधून उपलब्ध नुकसान भरपाई, इत्यादि वजा करुन व कर्जदाराची परतफेडीची क्षमता विचारात घेऊन जास्तीत जास्त १५ वर्षांपर्यंत निश्चित करता येतो. मात्र, हे, केलेल्या गुंतवणुकीच्या प्रकारावर तसेच जमीनीची मशागत (लॅंड शेपिंग), गाळ दूर करणे, भू-संधारण, इत्यादि कारणे सोडून, वित्तसहाय्य केलेल्या मालमत्तेच्या उपयोजितेवर अवलंबून असेल. अशा प्रकरणात शेतकीसाठी असलेल्या यंत्र-सामुग्रीसाठी, म्हणजे पंप सेट्स व ट्रॅक्टर, कर्ज देतांना, अग्रिम राशि दिल्यापासून कर्जाची मुदत ही सर्वसाधारणतः ९ वर्षांच्या वर नसावी इकडे लक्ष दिले पाहिजे.

**३१)** अस्तित्वात असलेल्या कर्जांची पुनर्रचना करणे एवढेच नव्हे तर बँका ग्रस्त शेतकऱ्यांना विविध प्रकारची मुदत कर्जे विकास कार्यांसाठी देऊ करतील. जसे —

**अ) छोट्या प्रमाणावरील सिंचन** : विहिरी, पंप सेट्स इत्यादींच्या दुरुस्तीसाठी येणारा अंदाजे खर्च यांचा अंदाज घेऊन दिली जावी.

**ब) बैल** – जेथे ओझेवाहू जनावरे वाहून गेली असतील तेथे नवीन बैलजोडी / रेडे खरेदी करण्यास नवीन कर्जाच्या विनंतीचा विचार केला जावा. जेथे शेतकऱ्यांना नवीन जनावरे किंवा दुभती जनावरे घेण्यास कर्जे दिली गेली असतील तेथे त्या जनावरांच्या वैरणीसाठी / पशुखाद्या साठी कर्ज दिले जावे.

**क) दुभती जनावरे :** दुभत्या जनावरांसाठी मुदत कर्जे देतांना जनावरांची जात, दिले जाणारे दूध इत्यादींचा विचार केला जावा. कर्जाच्या रकमेत, गोठा / तबेला आदींची दुरुस्ती, साधने व पशुखाद्ये यांचाही समावेश केला जावा.

**ड) विमा संरक्षण** : चक्री वादळे व इतर नैसर्गिक आपत्ती येत असलेल्या क्षेत्रातील जनावरांचा विमा उतरवून घेतला पाहिजे. तसेच दुभती जनावरे व भारवाहू जनावरांवर खुणा केल्या जाव्यात म्हणजे अन्य लाभार्थी त्यांची पुनर्विक्री करु शकणार नाहीत.

**ई) कोंबड्या व डुकरे पालन** : कोंबडया, डुकरे व शेळीपालनासाठी द्यावयाची कर्जे निरनिराळ्या बँकांच्या मानकांनुसार दिली जातील.

**फ) मत्स्य पालन :** बोट, जाळी, आणि इतर साधने हरवून बसलेल्या कर्जदारांसाठी अस्तित्वात असलेल्या कर्जांची पुनर्रचना केवळ गुणवत्तेच्या निकषावरच दिली जावीत. त्यांना देण्यात येणारी कर्जे ही तीन ते चार वर्षांच्या मुदतीची असावीत. अस्तित्वात असलेल्या कर्जदारांना बोटीच्या दुरुस्तीसाठी कर्ज देण्याचा विचार करण्यात यावा. जेथे सरकारी अर्थसहाय्य (सबसिडी) दिले गेले आहेत तेथे कर्जाची रक्कम त्या प्रमाणात कमी करण्यात यावी. ज्या राज्यांमध्ये बोट, जाळी इत्यादींसाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी अर्थ सहाय्य उपलब्ध होण्याची शक्यता आहे, तेथे, या बाबतीत राज्य सरकारच्या संबंधित विभागाशी समन्वय साधण्याची काळजी घ्यावी. अग्रिम राशि देण्यासाठी असलेली प्रमाणे / मानके व अटी पूर्ण केल्या तरीही मत्स्यपालन विभागाकडून सहाय्य घ्यावे कारण त्यामुळे त्या विभागाने केलेले उपाय बँकांना या कार्यासाठी अर्थसहाय्य करण्यास उपयुक्त ठरतील. शक्य तो बोटींसाठी घेतलेले विमा संरक्षण हे सर्वसमावेशक व नैसर्गिक आपत्तींसाठीही घेतलेले असावे.

**३२)** वाहून आलेली वाळू काढून टाकून शेतजमीन परत मिळविण्यासाठी वित्तसहाय्याची आवश्यकता असू शकते. सर्वसाधारणतः वाळूचे / गाळाचे ३ इंच जाडीचे थर हे नांगरुन जमीनीत गाडले जाऊ शकतात किंवा कोणत्याही अर्थसहाय्याशिवाय शेतकऱ्यांकडून काढून टाकले जाऊ शकतात. तथापि ताबाडतोब पिके घेण्यासाठी जमीन पूर्ववत करण्यास कर्जासाठी केलेल्या अर्जांचा विचार केला जाऊ शकतो. जेथे खारवट जमीनीच्या पुनरुस्थापनासाठी (रिक्लमेशन) कर्ज आवश्यक असेल तेथे, पिकांसाठी असलेल्या कर्जांच्या २५% पर्यंतची रक्कम, त्या पिकासाठी असलेल्या कर्जाबरोबर अग्रिम राशि म्हणून देता येईल.

**३३)** इतर उपक्रमांसाठी म्हणजे, शेतकी, उद्याने/उद्यानविज्ञान, फुलबागा, विड्याच्या पानांची लागवड इत्यादींसाठी बँका, गुंतवणुकीसाठी आणि कार्यकारी भांडवलासाठी, त्यांच्या प्रचलित योजनांमधून कर्जे देऊ करतील आणि त्यासाठी त्यांच्या नेहमीच्या कार्यरीतींचे पालन करतील. शेत-मळ्यांपासून येणारी आवक, खर्चाची तोंडमिळवणी करु शकेपर्यंतच्या काळापर्यंत कार्यकारी भांडवल देता येऊ शकेल.

**३४)** तथापि, गरजेवर आधारित अशी पिकांसाठी कर्जे आवश्यक असल्याचे दिसून आल्यास तशी कर्जे उभ्या पिंकाच्या फळबागांच्या पुनरुज्जीवननासाठी प्रत्येकाचे मूल्यांकन केल्यानंतर दिली जातील.

**३५)** पर्याप्त प्रमाणावर बियाणे व खते मिळवूनदेण्या संबंधीचा प्रश्न राज्य सरकार व प्रत्येक जिल्ह्यातील प्राधिकरण यांच्याशी चर्चा करुनच सोडवावा लागेल. तसेच, योग्य अशा जलसिंचन सुविधांबाबत मात्र, राज्य सरकार, सरकारी मालकीच्या उथळ व खोल नलिका कूपांची तसेच नदीच्या पूर व आपत्ती मुळे हानी झालेल्या उदंचन जलसिंचन (लिफ्ट इरिगेशन) योजनांची दुरुस्ती करील. मत्स्य पालनाबाबत, राज्य सरकारचा मत्स्यपालन विभाग छोटे मासे (फिंगरलिंग्स) मिळविण्याचा बंदोबस्त करुन बँकेच्या वित्तसहाय्याने टँक-फिशिंग कर इच्छिणारांना त्यांचा पुरवठा करील.

**३६)** अशा कार्यांसाठी दिलेल्या कर्जांमुळे आवश्यक असलेले पुनर्वित्तसहाय्य (रिफायनान्स) वाणिज्य बँकांना, नाबार्डच्या व्याजदराने मिळावे म्हणून राज्य सरकारला योजना तयार करण्याचा विचार करावा लागेल.

## क) अटी आणि शर्ती

**३७)** मदतकार्यासाठी दिल्या जाणाऱ्या कर्जांसाठी असलेल्या अटी व शर्तींमध्ये तारण / सुरक्षा ठेव (सिक्युरिटी), मार्जिन इत्यादी मध्ये लवचिकता असावी.

**अ) हमी**

डिपॉझिट इन्शुअरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन द्वारा संरक्षित (कव्हर्ड) छोट्या कर्जांबाबत वैय्याक्तिक हमीचा आग्रह धरला जाणार नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत वैय्याक्तिक हमी न मिळाल्यास कर्ज नाकारले जाऊ नये.

**ब) सुरक्षा (सिक्युरिटी)**

१) जेथे पुरामुळे किंवा नुकसानीमुळे बँकेला दिलेली सिक्युरिटी नष्टप्राय (इरोडेड) झाली असेल तेथे अतिरिक्त नवी सिक्युरिटीचा आभाव आहे म्हणून अर्थसहाय्य नाकारले जाऊ नये. देण्यात येणाऱ्या कर्जाच्या रक्कमेपेक्षा सिक्युरिटी (अस्तित्वात असलेली व नवीन कर्जामुळे मिळणारा लाभ / मालमत्ता) ची किंमत कमी असली तरीही नवीन कर्ज दिले जावे. नवीन कर्जांसाठी सह्रदय दृष्टिकोन ठेवला जावा.

२)) जेथे पिकासाठी आधी दिलेले कर्ज (जे मुदत-कर्जात परिवर्तित केले गेले आहे) हे वैय्यक्तिक तारण (सिक्युरिटी) / पिके गहाण ठेवून दिले गेले आहे, आणि कर्जदार या परिवर्तित कर्जासाठी सिक्युरिटी म्हणून जमीन तारण ठेवू शकत नाही, तेथे, कर्जदार जमीन तारण ठेवू शकत नाही या एकाच कारणासाठी त्याला परिवर्तन सुविधा नाकारली जाऊ नये. कर्जदाराने जमीनीचे तारण ठेवून आधीच मुदत कर्ज घेतले असेल, तर बँकेने परिवर्तित मुदत कर्जासाठी ‘सेकंड चार्ज’ वरच समाधान मानावे. परिवर्तन सुविधेसाठी बँकांनी त्रयस्थ पक्षाची हमी मागण्याचा आग्रह धरु नये.

३) साधने बदलण्यासाठी, दुरुस्ती इत्यादींसाठी मुदत कर्जे देताना आणि कारागीर व स्वयं-रोजगार करणारांना किंवा पिकांसाठी कर्जे देतांना नेहमीसारखी सिक्युरिटी घेतली जावी. जेथे तारण (सिक्युरिटी) म्हणून जमीन दिली जाते तेव्हां मालकी हक्काच्या मूळ (ओरिजिनल) नोंदी हरविल्या असल्यास, नोंदींचा पुरावा, हरविलेल्या शेतकऱ्यांना वित्तसहाय्य करतांना महसुल खात्याच्या

अधिकाऱ्याने दिलेल्या (म्हणजे डीड्स फॉर्म मध्ये व नोंदणीकृत सह-पीक धारकांना दिलेल्या प्रमाणपत्रात) प्रमाणपत्राचा स्वीकार केला जावा.

४) ग्राहक सेवेबाबत आरबीआयने केलेल्या शिफारशींनुसार, ज्यांना रु ५०० पर्यंतचे कर्ज हवे असेल त्यांना, कोणत्या कामासाठी, कोणत्याही प्रकारची कोलॅटरल सिक्युरिटी किंवा गॅरंटी न मागता बँका त्यांना अर्थसहाय्य करतील.

**क) मार्जिन**

**३८)** मार्जिनची आवश्यकता रद्द समजता येईल किंवा संबंधित राज्य सरकारने दिलेले अनुदान / अर्थसहाय्य हेच मार्जिन समजले जाईल.

**ड) व्याजाचे दर**

**३९)** व्याजाचे दर रिझर्व बँकेच्या निदेशांनुसार असतील. तथापि त्यांच्या कार्यक्षेत्रात, बँकांनी, कर्जदारांच्या अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन आपत्तिग्रस्त लोकांना सवलतीची वागणुक द्यावी अशी अपेक्षा आहे.

डिफरेंशियल ऑफ इंटरेस्ट योजनेखाली पात्रतेचे निकष पूर्ण करणारांना, या योजनेच्या तरतुदींनुसार कर्ज दिले जावे.

अस्तित्वात असलेल्या थकबाकीबाबत, कोणतेही दंडात्मक व्याज आकारले जाणार नाही तसेच बँकांनी योग्य त्या रीतीने चक्रवाढ व्याज आकारणे ही स्थगित / लांबणीवर टाकावे.

परिवर्तित / पुनर्रचित कर्जांबाबत आकारलेले दंडात्मक व्याज आकारले जाणार नाही. तसेच बँकांनी योग्य वाटेल त्याप्रमाणे चक्रवाढ व्याज आकारणे टाळावे.

परिवर्तित किंवा पुनर्रचित कर्जांबाबत दंडात्मक व्याज आकारले गेले असल्यास ते रद्द करण्याचा विचार करावा व बँकांनी दंडात्मक व्याज आकारु नये.

**३) कारागीर व स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती--**

**४०)** ग्रामीण भागातील कारागीर, आणि हातमाग-विणकरासह स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींच्या सर्व वर्गांना त्यांच्या कामाच्या जागां (शेड्स)ची दुरुस्ती कामासाठी लागणारी साधने तसेच आणि भांडारासाठी कच्चा माल विकत घेण्यासाठी कर्जांची आवश्यकता असेल. असे कर्ज मंजुर करताना, संबंधित राज्य सरकार कडून मिळणारे अनुदान / अर्थसहाय्य विचारात घेतले जावे.

**४१)** बँकेची सुविधा व सहाय्य नसलेले कितीतरी कारागीर, व्यापारी व स्वयंरोजगार करणारे लोक असू शकतील. त्यांनाही अशा वेळी पुनरुज्जीवनासाठी वित्तसहाय्याची आवश्यकता असेल. असे वर्ग ज्या बँकशाखांच्या अधिकार क्षेत्रा खाली येतात त्या बँक शाखांकडून वित्तसहाय्य मिळविण्यास ते वर्ग पात्र असतील. जेथे अशी व्यक्ती / पक्ष एकापेक्षा अधिक बँकेच्या अधिकार क्षेत्राखाली येते असेल तेथे संबंधित बँकांनी एकत्र येऊन हा प्रश्न सोडवावा.

**४) लघु व छोटे उद्योग (एकके)**

**४२)** ग्रामोद्योग व कुटीरोद्योग क्षेत्राखाली असणाऱ्या तसेच लघु उद्योग व छोटेखानी मध्यम उद्योग यांची हानी झाली असल्यास त्यांच्या कडेही लक्ष दिले जाणे आवश्यक आहे. याबाबत कारखाने / इमारती, शेड्स व यंत्रे यांच्या दुरुस्ती व पुनर्निमाणासाठी तसेच बिघडलेले / बाद झालेले यंत्र-भाग बदलण्यासाठी मुदत-कर्जे तातडीने दिली गेली पाहिजेत.
**४३)** जेथे कच्चा माल किंवा तयार माल वाहून गेला असेल किंवा त्याची हानी झाली असेल, तेथे कार्यकारी भांडवलासाठीची बँकेची सुरक्षा अर्थातच नष्ट झाली असेल, तसेच कार्यकारी भांडवलाचे खाते (कॅश क्रेडिट किंवा कर्ज) विस्कळित (आऊट ऑफ ऑर्डर) झाले असेल. अशा प्रसंगी, सुरक्षेच्या (सिक्युरिटी) अतिरिक्त काढली गेलेल्या रकमेचे (ड्रॉईंग्स) मुदत कर्जात परिवर्तन करुन कर्जदाराला कार्यकारी भांडवल उपलब्ध करुन देतील.

**४४)** झालेले नुकसान आणि पुनर्वसन करण्यास लागणारा कालावधि तसेच उत्पादन व विक्री पुनः सुरु करण्यास लागणारा कालावधि याचा विचार करुन व एककाची आवक-उत्पादनक्षमता लक्षात घेऊन, मुदत कर्जांच्या परतफेडीच्या हप्त्यांची पुनर्रचना करावी लागेल. मार्जिनच्या रकमेतील कमतरता माफ करावी लागेल किंवा तिची सूट द्यावी लागेल आणि कर्जदाराला मार्जिन देण्यासाठी, त्याच्या, भविष्यातील रोख रक्कम हळुहळु मिळविण्यासाठी वेळ द्यावा लागेल. जेथे राज्य सरकार किंवा अन्य संस्थांनी अनुदान / सहाय्य /

बीज रक्कम देण्यासाठी एखादी विशेष योजना तयार केली असेल, तेथे, त्या अनुदान / सहाय्य / बीज रकमेच्या अनुषंगाने मार्जिन ठरवावे लागेल.

**४५)**एखाद्या लघु / छोट्या एककाला त्याच्या पुनर्वसनासाठी कर्ज देण्यापूर्वी पुनर्वसन कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर त्या उद्योगाची सफलक्षमता किती असेल याचा विचार बँकांनी करावा.

## ५) इतर बाबी

### अ) व्यापार-सातत्यासाठी योजना आखणे

४६. बँक प्रणालीमध्ये तंत्रज्ञानाच्या वाढता उपयोग लक्षात घेता, व्यापार-सातत्य योजना (बीसीपी) ही, व्यापारात कमीत कमी व्यत्ययासाठी व प्रणाली बंद न व्हावी म्हणून अत्यावश्यक ठरते. व्यापार-सातत्य योजनेचा एक भाग म्हणून, नैसर्गिक आपत्तींमध्ये सापडू शकणाऱ्या क्षेत्रात / प्रदेशात असलेल्या बँक शाखांना पर्यायी शाखा बँकांनी ठरविल्या / नेमल्या पाहिजेत. अस्तित्वात असलेल्या सूचनांनुसार, बँकेच्या संचालक मंडळांनी बीसीपीसाठी धोरण ठरविणे, पुरेसे स्त्रोत उपलब्ध करुन देणे आणि स्पष्ट मार्गदर्शन करणे याबाबतच्या सूचना त्यांच्या वरिष्ठ व्यवस्थापनांना देणे गरजेचे आहे. केवळ आपत्तीच्या वेळी (डीआर) व्यवस्था करण्याऐवजी बँकांनी एक परिपूर्ण असे सर्वसमावेशक बीसीपी धोरण बनवावे. अशा आपत्ती-मुक्तता (डी आर) साईटस सुरुच ठेवून त्यांचे सर्वसमावेशक असे परीक्षण करुन प्राथमिक व दुय्यम साईटसमध्ये समन्वय साधावा.

ब) ग्राहकांचा त्यांच्या बँक खात्यांपर्यंत प्रवेश

४७.) नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त होणाऱ्या क्षेत्रात बँक शाखा असल्यास व तेव्हा त्या सर्व साधारणपणे कामकाज करु न शकल्यास, आरबीआयला तसे कळवून बँका तात्पुरत्या जागेतून / परिसरातून कामकाज करु शकतात. अशी तात्पुरती जागा ३० दिवसांपेक्षा अधिक कार्यान्वित ठेवायची असल्यास, त्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाची (आर ओ) विशेष परवानगी घ्यावी लागेल. ग्रस्त झालेल्या क्षेत्रात बँक-**सेवा** देण्यासाठी, आरबीआयच्या आर ओ ला कळवून, बँका, वेगळी कार्यालये, विस्तारित काऊंटर्स किंवा भ्रमण बँकिंग सुविधांचे आयोजन करु शकतात.

ग्राहकाची रोकड रकमेची गरज भागविण्यासाठी, स्थिर ठेवीसारख्या बाबतीत खात्यांमधून पैसे काढण्याबाबतचा दंड रद्द करु शकतात.

नादुरुस्त एटीएम केंद्रे शक्य तेवढी लवकर पुनः सुरु करणे किंवा अशा सुविधा देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे यांना महत्व दिले जावे. ग्राहकांना दुसरी एटीएम केंद्रे, भ्रमण एटीएम केंद्रे वापरता यावीत यासाठी व्यवस्था करण्याचाही विचार बँकांनी करावा.

**क) चलन व्यवस्थापन**

४८) एखाद्या बँकेची करन्सी चेस्ट शाखा ग्रस्त झाल्यास, बँकेने जवळपास असलेल्या दुसऱ्या कोणत्याही बँकेच्या करन्सी चेस्ट शाखेशी आरबीआयच्या सबंधित आरओ ला कळवून, संपर्क साधावा, म्हणजे ती शाखा, ग्रस्त झालेल्या शाखांना चलनी नोटांचा पुरवठा करेल. तशीच आवश्यकता भासल्यास, रिझर्व्ह बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला कळवून, ज्यांच्या करन्सी चेस्ट्स ग्रस्त झाल्या आहेत अशा बँका, त्यांची दैनंदिन गरज भागविण्यासाठी, तात्पुरत्या कालासाठी रिपॉझिटरीज उघडू शकतात.

**ड) के.वाय.सी. नॉर्म्स**

४९) नैसर्गिक आपत्तींनी ग्रस्त झालेल्या व्यक्तींना नवीन खाती उघडण्यास मदत व्हावी म्हणून आणि विशेषतः सरकारी प्रातिनिधिक संस्थांनी दिलेली मदत त्या व्यक्तींना मिळावी म्हणून बँका पुढील कागदपत्रे दिली गेल्यासही खाते उघडू देऊ शकतात -

अ) संपूर्ण केवायसी प्रणाली पार केलेल्या अन्य खातेदाराने दिलेली ओळख किंवा

ब) ओळख दर्शविणारी कागदपत्रे, जसे मतदार ओळखपत्र, वाहन चालन परवाना, कार्यालयाने , कंपनीने, शाळा-कॉलेज इत्यादींनी दिलेले ओळखपत्र व त्यासोबत पत्ता दर्शविणारे कागदपत्र म्हणजे विजेचे देयक, रेशन कार्ड इत्यादि, किंवा

क) वरील परिच्छेद ५ ब) मध्ये दर्शविलेले कागदपत्र असलेल्या दोन शेजाऱ्यांनी दिलेली ओळख किंवा

ड) या सर्वांचा अभाव असल्यास बँकेचे समाधान करु शकतील असा इतर पुरावा वरील सूचना ह्या, खात्यातील शिल्लक एका वर्षात रु.५०,००० च्या वर नसल्यास किंवा मिळालेली मदत यापेक्षा अधिक नसल्यास आणि त्या खात्यातील एकुण जमा (क्रेडिट) रु, १,००,०००/- पेक्षा अधिक नसल्यास किंवा मिळालेली मदत त्यापेक्षा अधिक नसल्यास लागू होतील.

**ई) समाशोधन व हिशेबपूर्ती प्रणाली**

५०) समाशोधन सेवेत सातत्य असावे यासाठी आरबीआयने बँकांना २० मोठ्या शहरात ऑन-सिटी बॅकअप सेंटर्स, आणि इतर शहरांसाठी अल्पखर्चाची हिशेबपूर्ती पध्दत वापरण्याचा सल्ला दिला आहे. एखाद्या समाशोधन क्षेत्रातील बँका लवचिक अशा समाशोधक सेवा देण्याच्या उद्देशाने एकत्र येऊ शकतात. तथापि, जेथे समाशोधन सुविधा विस्कळित झाल्या आहेत तेथे ग्राहकांची पैशांची गरज भागविण्यासाठी अधिक / मोठ्या रकमांच्या चेकस् चे डिस्काउंटिंग करण्याचा विचारही बँका करु शकतात. तसेच नैसर्गिक आपत्तींनी ग्रस्त झालेल्या व्यक्तींसाठी, बँका ईएफटी, ईसीएस किंवा मेल सर्व्हिसेस चे शुल्क रद्द करण्याचाही विचार करु शकतात.

## ६) दंगे आणि प्रक्षुब्ध परिस्थितीच्या बाबतीत या मार्गदर्शक सूत्रांचा उपयोग

५१) जेव्हां-जेव्हा आरबीआय दंगे / प्रक्षुब्ध परिस्थितीमुळे ग्रस्त झालेल्या व्यक्तींना मदत देण्यासाठी बँकांना सांगेल तेव्हा, बँकांनी वर दिलेल्या मार्गदर्शक सूत्रांचे ढोबळमानाने पालन करावे. मात्र अशा वेळी राज्य प्रशासनाने ज्यांची ओळख पटविलेली आहे अशा व दंगे / प्रक्षुब्ध परिस्थितीमुळे खरोखरीच ग्रस्त झालेल्या व्यक्तींनाच या मार्गदर्शक सूत्रांच्या अनुसार मदत केली जावी.

राज्य सरकारकडून विनंती / माहिती मिळाल्यानंतर भारतीय रिझर्व बँकेकडून अन्य बँकांना व त्यांच्या कडून त्या बँकांच्या शाखांना निदेश दिले जाईपर्यंत दंगाग्रस्त लोकांना मदत मिळेपर्यंत साधारणतः बराच विलंब होत असतो. अशा ग्रस्त लोकांना त्वरित मदत मिळावी या साठी असे ठरविण्यात आले आहे की दंगे / प्रक्षुब्ध परिस्थिती निर्माण झाल्याबरोबर जिल्हाधिकाऱ्याने लीड बँक ऑफिसला डीसीसीची सभा बोलविण्यास सांगून, दंगाग्रस्त भागात झालेली जीवित व मालमत्तेच्या हानीचे प्रमाण याचा अहवाल डीसीसी कडे सादर करावा. अशा दंगे / प्रक्षुब्ध परिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व मालमत्तेची हानी झाल्याची डीसीसीची खात्री पटल्यास, वरील मार्गदर्शक सुत्रांनुसार, ग्रस्त झालेल्या लोकांना मदत देता येईल. काही बाबतीत, जेथे जिल्हास्तरीय सल्लागार समिती नसतील तेथे जिल्हाधिकाऱ्याने त्या राज्याच्या राज्यस्तरीय बँकर्सची सभा बोलावून ग्रस्त झालेल्या लोकांना मदत देण्याचा विचार करण्यात यावा. जिल्हाधिकाऱ्याने सादर केलेला अहवाल व त्यावर डीसीसी, एसएल बीसी यांनी घेतलेल्या निर्णयाची नोंद केली जावी व तो त्या सभेचा इतिवृत्ताचा भाग समजला जावा. अशा सभेच्या कामकाजाची एक प्रत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविली जावी.

## ७) व्यापार व उद्योग यांच्याबाबत या मार्गदर्शक सूत्रांची उपयोगिता

५२) कर्ज पुढे ढकलण्याचा अधिकार, कमाल कर्जफेड काल, पुनर्रचित कर्जासाठी अतिरिक्त तारण, व नवीन कर्जासाठी मालमत्तेचे वर्गीकरण, ह्या बाबी, शेतीशिवाय, उद्योग व व्यापार यांच्या खात्यांसह पुनर्रचित अशा सर्व कर्जखात्यांना लागू होतील.

<u>परिशिष्ट</u>

**महापरिपत्रक – नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रात बँकांनी मदतकार्याबाबत मार्गदर्शक सुत्रे.**

<u>महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी</u>

| क्र. | परिपत्रक क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | आरपीसीडी.क्र.पीएलएफएस.बीसी. १२८/०५.०४.०२/९.७.९८ | २०-०६-९८ | नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या लोकांसाठी सहाय्य- शेतकीसंबंधी अग्रिम राशी |
| २. | आरपीसीडी.क्र.पीएलएफएस.बीसी. ५९/०५.०४.०२/९२-९३ | ०६-०१-९३ | नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रांमध्ये बँकांनी द्यावयाच्या सहाय्यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे- (उपभोगीय कर्जे) |
| ३. | आरपीसीडी.क्र.पीएलएफएस.बीसी. ३८/पीएस.१२६/९१/९२ | २१-०९-९१ | दंगे / जातीय प्रक्षुब्धतेमुळे ग्रस्त झालेल्या लोकांसाठी बँकांद्वारे मदतकार्य |
| ४. | आरपीसीडी.क्र.पीएस.बीसी. ६/पीएस.१२६-८४ | २-८-८४ | नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या लोकांसाठी बँकांनी द्यावयाच्या मदतकार्यासंबंधी सुधारित मार्गदर्शक सूत्रे |
| ५. | आरपीसीडी.पीएलएफएस.बीसी. क्र.४२/०५.०२.०२/२००५-०६ | १-१०-२००५ | बँकिंग प्रणालीद्वारे शेतकी व संबंधित कार्यांसाठी कर्ज देण्याबाबत सल्लागार समिती |
| ६. | आरपीसीडी.सीओ.पीएलएफएस.बीसी. १६/०५-०४-०२/ २००६-०७ | ऑगस्ट ९, २००६ | नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रांमध्ये बँकांनी द्यावयाच्या सहाय्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे. |
| ७. | आरपीसीडी.पीएलएफएस.क्र.बीसी. क्र.२१/०५.०५.०२/२००६-०७ | सप्टेंबर ४, २००६ | नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रांमध्ये बँकांनी द्यावयाच्या सहाय्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे. |